# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा

:: संपादक ::

डॉ. विलास विठ्ठल नाबदे

सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
अहमदनगर महाविद्यालय, अ.नगर

Preetam Prakash College PPC 0921 Bhosari, Pune-411039

PRINCIPAL
PREETAM PRAKASH COLLEGE
Indrayani Nagar, Bhosari, Pune-411039

पुनम पब्लिकेशन

१२३/१, बी–ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा, दिल्ली – ११० ०५३

Scanned with OKEN Scanner

Preetam Prakash College
PPC
0921
Bhosari, Pune-411039

## अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | लोकशाही संकटात आहे का? भारताचा अनुभव काय सांगतो? | - | डॉ. विठ्ठल दहिफळे | १ |
| २. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने- भय इथले संपत नाही. | - | गणेश महादेव सातपुते | १६ |
| ३. | भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : स्थित्यंतरे आणि वाटचाल भारतीय लोकशाहीचे आधारस्तंभ | - | सविता तानाजी घोगरे | २० |
| ४. | भारतीय लोकशाही - संविधान- एक सर्वांगिण शिक्षण ..... | - | अभिन संपत पोटे | २६ |
| ५. | भारतीयसंसदीय लोकशाही-आव्हाने आणि उपाय | - | डॉ. भागवत शंकर महाले | ३० |
| ६. | भारतीय लोकशाही : वाटचाल आणि भवितव्य | - | ममता जयराम इंदापुरे | ३८ |
| ७. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - | भोये सुरेश मुरलीधर | ४२ |
| ८. | भारतीय लोकशाही व मतदार वर्तन | - | दिपक बुधवंत | ४८ |
| ९. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - | जमीर मुम्मन इनामदार | ५९ |
| १०. | भारतीय संविधानाची मूलभूत चौकट | - | डॉ. काळे संजय अंकुश | ६६ |
| ११. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - | डॉ. शेख वहिदा अब्दुल रज्जाक | ७३ |
| १२. | भारतीय लोकशाही व मतदाराचे वर्तन | - | शिवलाल कांतीलाल शिंदे | ७८ |
| १३. | भारतीय लोकशाही आणी मतदार वर्तन | - | मोहिनी पांडुरंग झिंजुर्डे | ८२ |
| १४. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | - | गायत्री गणेश राऊत | ८४ |
| १५. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | चैचल मातु | ८८ |
| | | - | प्रा. डॉ. रिकामे राजकूमार | |
| १६. | भारतीय लोकशाही पुढील समकालीन आव्हाने | - | नकुल पोपट खवले | ९७ |
| १७. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | दाते सुप्रिया सिताराम | १०२ |
| १८. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | - | डॉ. रविराम अंबादास वटने | १०७ |
| १९. | आर्थिक लोकशाहीची गरज : आव्हाने आणि भवितव्य | - | डॉ. संदीप इरोळे | ११० |
| २०. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | महालक्ष्मी सुभाष ठुबे | ११९ |
| २१. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | नवनाथ विठोबा नागरे | १२३ |
| २२. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाणे | | रवि साहेबराव गायकवाड | १२६ |
| २३. | भारतीय लोकशाहीची आव्हाने: संरक्षण- धोरणातील बदल आणि भविष्य | - | डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे | १३० |
| २४. | भारताचे संविधान व लोकशाही | - | नामदेव अशोक पवार | १३३ |


**PRINCIPAL**
**PREETAM PRAKASH COLLEGE**
Indrayani Nagar, Bhosari, Pune-411039

Scanned with OKEN Scanner

# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**महालक्ष्मी सुभाष ठुबे**
भोसरी, पुणे ४११०२६.

**प्रस्तावना :**

घटनेत सांगितल्याप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांच्या आधारे लोकशाही जपणे आणि जगणे होय. लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणूक नाही हे केवळ लोकशाहीचे राजकीय रूप आहे. लोकशाही हा जीवनाचा मार्ग व्हायचा असेल तर ती समाजाच्या विविध क्षेत्रात रुजली पाहिजे, पोहचली पाहिजे. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताकडे पाहिले जाते. परंतु लोकशाही म्हणजे काय? तर प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व निपक्षपातीपणे निवडणुकांद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी द्वारे चालणारे राज्य म्हणजे लोकशाही. जगातली सर्वात मोठी लोकशाही भारतात आहे आणि मतदान व्यवस्था हा आपल्या देशाचा महत्त्वाचा कणा आहे.

**मर्यादा :-**

लोकशाही व्यक्तीच्या विकासासाठी पुरेशी संधी देते. तथापी अनेक देशात नागरिकांच्या अधिकारावर मर्यादा येतात. कारण सामाजिक दडपण, असहिष्णुता आणि सुरक्षितता यातून व्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादा येतात. संविधानाने दिलेले अधिकार जर समाजाला मान्य नसतील तर ते फक्त कागदावर राहतात आणि व्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा येतात.

उदा. आंतरजातीय विवाहाला कायद्याने मान्यता आहे पण समाजात मात्र अशा विवाहांना विशेष मान्यता नाही.

आपल्यापेक्षा इतरांचे मत वेगळे असू शकते हे मान्य करून इतरांना मत मांडण्यास मोकळी करून देणे म्हणजे सहिष्णुता. लोकशाहीत असहिष्णुता म्हणजे बहुसंख्य गटाचा विचार आणि चालीरिती अल्पमतातील लोकांवर लादणे होय. समाजात सहिष्णुतेचे प्रमाण जितके अधिक तितकी लोकशाही यशस्वी होण्याची शक्यता जास्त असते. उलट समाज जर असहिष्णु असेल तर ते लोक लोकशाही पुढे आव्हान ठरतात. संघटित गुन्हेगारी आणि दहशतवाद यांच्यामुळे जनतेच्या सुरक्षेसाठी सरकारला जास्त काळजी घ्यावी लागते. ते सुरक्षिततेच्या हेतुने नागरिकांच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर काही मर्यादा लादू शकतात. तथापी या बंधनांचे लोकशाहीच्या मर्यादित रूपांतर होणार नाही याची सरकारने काळजी घेतली पाहिजे. सुरक्षितता आणि व्यक्ती स्वातंत्र्य यांचा समतोल साधण्याचे आव्हान आहे.

PRINCIPAL
PREETAM PRAKASH COLLEGE
Indrayani Nagar, Bhosari, Pune-411039

**नागरिकांच्या सहभागा विषयी आव्हाने –**

**१) मर्यादित मतदान** – लोकशाहीमध्ये लोक त्यांचे प्रतिनिधी निवडणूकीतून निवडून देतात. हे प्रतिनिधी देशाची धोरणे ठरवतात आणि देशाचा कारभार पाहतात. तथापी अनेक देशांमध्ये मतदान मर्यादित आहे. लोकशाहीत मर्यादित मतदान काही महत्त्वाच्या आव्हानांकडे नेतात. जर सर्व नागरिकांनी मतदान केले नाही तर निवडून येणारे प्रतिनिधी सर्व जनतेचे प्रतिनिधी कसे ठरतील? मतदान करणाऱ्या लोकांचे म्हणणे काय आहे हे कसे कळणार?

**२) जनतेचा मर्यादित पुढाकार** – नागरिकांनी जरी राजकीय सभेत भाग घेतला तरी पुढाकार घेऊन राजकीय धोरणांबद्दल चर्चा करणे, लोकांना संघटित करणे अशा कृतींमध्ये जनतेचा सहभाग फार थोडा असतो. नागरिकांचा पुढाकार वाढवण्याचे आव्हान लोकशाही पुढे आहे. ज्या अर्थी जनतेचा पुढाकार जेवढा अधिक तेवढी लोकशाही बळकट असेल.

**३) सहभागाच्या संधी आणि शासन व्यवहारांचे गुंतागुंतीचे स्वरूप** – कामकाजाचा व्याप खूप मोठा असतो त्यामुळे आपल्या दैनंदिन आयुष्यातून वेळ काढून राजकारणासाठी वेळ देणे नागरिकांना शक्य होते तसे नाही. याकरिता सार्वजनिक कामकाजात भाग घेण्यासाठी फार अशा संधी उपलब्ध नसतात. भारतात गाव किंवा शहरातील प्रभाग पातळीवर नागरिकांच्या सहभागाच्या काही तरतुदी केल्या आहेत. तथापी कोणत्या विषयावर किती खर्च करावा व कोणत्या विकास कामांना जास्त महत्त्व देऊन ती तातडीने सुरू करावीत यासारख्या प्रश्नांवर जास्त भर दिला जात नाही.

**४) लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग वाढवण्यासाठीचे उपाय** – राजकीय पक्ष सभासद नोंदणी मोहिम आणि पक्षकार्यात सामील करून घेणे.

सभा आणि मेळावे भरून लोकांचे म्हणने सरकारपर्यंत पोहोचवणे. कायदेशीर तरतुदी आणि लोकांना कारभारात भाग घेण्याच्या संधी उपलब्ध करून देणे.

**५) विषमतेचे आव्हान** – एखादा समूह किंवा समाज गट श्रेष्ठ किंवा कनिष्ठ आहे या समजूतीच्या आधारे समाजाची विभागणी झालेली असते तेव्हा त्याला विषमता म्हणतात. विषमता ही रंग, जात, लिंग किंवा संपत्ती या आधारावर असू शकते. लोकशाहीला विषमतेशी झगडावे लागते. गरिबी आणि बेरोजगारी असणाऱ्या समाजात लोकशाहीला मर्यादा येतात. लोकशाहीने गरिबी कमी करण्याचे आणि गरिबांना सर्व मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे उपाय योजले पाहिजे.

**६) प्रादेशिक विषमता** – अनेक देशांमध्ये काही प्रदेश इतरांपेक्षा जास्त प्रगत असतात आणि काही प्रदेशांचा विकास कमी झालेला असतो याला प्रादेशिक विषमता असे म्हणतात. प्रादेशिक विषमतेमुळे लोक स्थलांतरित होऊन चांगली नोकरी मिळवण्यासाठी किंवा उदरनिर्वाहासाठी जास्त प्रगत असलेल्या भागात जातात. त्यामुळे विकसित भागांवर दडपण येते आणि सुविधांवर ताण पडतो. मूळचे आणि बाहेरचे असा वाद सुरू होतो आणि सामाजिक तणाव वाढतो. मागास प्रदेशात आपल्यावर अन्याय होत आहे आणि आपल्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे अशी भावना लोकांमध्ये निर्माण होते. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका उत्पन्न होऊ शकतो. प्रादेशिक समानता आणण्यासाठी उपाय योजले पाहिजे. समतोल विकास, साधन संपत्ती मध्ये वाटा, सत्तेत भागीदारी अशा तीन मार्गाने प्रादेशिक विषमतेमधून निर्माण होणाऱ्या आव्हानांना यशस्वीपणे तोंड देता येते. लोकशाहीत निर्माण होणारे आव्हाने दुहेरी स्वरूपाची असतात. लोकशाहीत प्रश्न हे कायदे, व्यक्तीस्वातंत्र्य, सहिष्णुता

Preetam Prakash College PPC 0921 Bhosari, Pune-411039

PRINCIPAL
PREETAM PRAKASH COLLEGE
Indrayani Nagar, Bhosari, Pune-411039

यांच्या आधारावर लोकशाही मार्गाने सोडवावे लागतात. तसे केले नाही तर प्रश्न सुटले तरी लोकशाही राहणार नाही. लोकशाहीसाठी सार्वजनिक हित साधण्यासाठी नुसती कायदेशीर तरतूद असणे पुरेशी नसते. शासनाने लोकशाही मार्गाने धोरणे शोधली पाहिजे आणि अमलात आणली पाहिजे. ज्यातून लोकांना व्यवस्थित पणाचा विश्वास बसेल आणि विषमता काढून टाकली जाईल. थोडक्यात लोकशाही समोर जात असणाऱ्या सर्व समस्यांना लोकशाही मार्गानेच चर्चा करून, वाटाघाटी करून आणि सहकार्याने सोडवल्या पाहिजेत.

**७) भ्रष्टाचार** – आधुनिक काळामध्ये भ्रष्टाचाराची एक ज्वलंत समस्या निर्माण झालेली आढळते. शासकीय क्षेत्रापासून तर धार्मिक क्षेत्रापर्यंत भ्रष्टाचार पाहायला मिळतो.

इलियट व मेरिल यांच्या म्हणण्यानुसार, ''प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा मिळवण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक कर्तव्याचे पालन न करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

संपूर्ण व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार दिसून येतो. सरकारी अधिकारी कुठलेही काम अगदी सहजासहजी करत नाही. (काही अपवाद वगळता) त्यामुळे काम टाळण्याचा प्रकार हे देखील भ्रष्टाचारांमध्ये येतो. केंद्र सरकारच्या प्रशासन असो की राज्याचे प्रशासन प्रत्येक प्रशासन क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार पाहायला मिळतो. टेबलाखालून पैसा गेल्याशिवाय कुठलीही फाईल पुढे सरकत नाही. देशातील पोलीस यंत्रणेला देखील भ्रष्टाचाराची कीड लागलेली आहे. कायद्याचा दुरुपयोग कसा करावा हे पोलीस अधिकाऱ्यांना चांगले माहीत असते. चोरी, दरोडेखोरी, महिलांविरोधी हिंसाचार इत्यादी अनेक कायदे असताना गुन्हेगारांना शिक्षा होत नाही किंबहुना गुन्ह्यांना आळा बसत नाही याचे उदाहरण म्हणजे भ्रष्ट पोलीस यंत्रणा. या पोलिस यंत्रणेतील भ्रष्टाचारामुळे सराईत गुन्हेगार मोकाट फिरताना आढळतात.

ग्राम पंचायत पासून ते महानगरपालिकेच्या प्रशासन क्षेत्रापर्यंत सर्वत्र भ्रष्टाचार आढळतो. स्थानिक प्रशासनातील भ्रष्टाचारामुळे सामान्य लोकांना वेटीस धरले जाते. तहसील कार्यालयात कुठलेही काम लाच दिल्याशिवाय होत नाही. जातीच्या दाखल्यापासून तर उत्पन्नाच्या दाखल्यापर्यंत लाच फेकल्याशिवाय काम होत नाही.

राजकीय नेते सत्तेचा दुरुपयोग करून करोडो रुपये लुटल्याचे आढळते. सर्वसामान्य जनतेचा पैसा भ्रष्टाचारी नेते स्वतःच्या भौतिक सुखामध्ये उधळत आहे. राजकीय नेत्यांच्या भ्रष्टाचारामुळे देशाचा विनाश होत आहे आणि सर्वसामान्य जनता त्यामध्ये भरडली जात आहे. भ्रष्टाचार करणारे लोक कायद्यामधील पळवाटा काढून निर्दोष झोपताना आढळतात. त्यामुळे पोलीस, कायदा, न्यायालय इत्यादीचा भ्रष्टाचारी लोकांना भीतीचा प्रश्नच राहत नाही. उलट पैशाच्या जोरामुळे न्यायव्यवस्था व पोलीस यंत्रणेला विकत घेता येते.

**८) लोकसंख्या वाढ एक आव्हान** – संपूर्ण देशांमध्ये विविध प्रकारच्या समस्या पाहायला मिळतात जसे की भ्रष्टाचार, महागाई, अशिक्षितपणा परंतु या सर्व समस्यांमधील सर्वात मोठी समस्या म्हणजे वाढती लोकसंख्या. नुकत्याच झालेल्या सर्वेनुसार भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश झालेला आहे. भारताने १४२.८६ कोटींचा आकडा पार केलेला आहे आणि भारत लोकसंख्येच्या बाबतीत प्रथम स्थानावर आहे. चीनची लोकसंख्या १४२.५७ कोटी आहे. लोकसंख्या वाढीमुळे आरोग्य, शिक्षण, रोजगार या सर्व प्राथमिक गरजांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. सामान्य

Preetam Prakash College PPC 0921 Bhosari, Pune-411039

PRINCIPAL
PREETAM PRAKASH COLLEGE
Indrayani Nagar, Bhosari, Pune-411039

जनतेला स्वतःच्या गरजा पूर्ण करणे अशक्य होत आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसंख्या आटोक्यात असणे फार महत्त्वाचे आहे.

**समारोप :**

भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचा विचार करत असताना देशातील सर्वसामान्य जनतेला विचारात घेऊन लोककल्याणकारी योजना आखल्या पाहिजे. लोकांवरील अन्याय, अत्याचार, दारिद्र्य, गरीबी हे दूर करण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे.

**संदर्भग्रंथ :**

१) प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन २०१२.

२) डॉ. दीपक पवार, लोकशाही समजून घेताना.

३) राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन.

□□□

PRINCIPAL
PREETAM PRAKASH COLLEGE
Indrayani Nagar, Bhosari, Pune-411039

Preetam Prakash ... Bhosari, Pune-41103...